ePaper


## एअरटेलच्या कर्मचाऱ्याकडून मराठीत बोलण्यास नकार, मनसे आक्रमक




| वर्ष - 8 । अंक - 235 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 12 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- दिल्लीचा संघ थेट फायनलमध्ये!
- राहुलने नाकारली कर्णधारपदाची ऑफर
- देशात स्वाइन फ्लूचा धोका वाढला!
- बलोचिस्तानचा पाकिस्तानला इशारा

## मुख्यमंत्री सिद्धरामय्यांची मुस्लिम समाजाला खैरात!

# कर्नाटकचे 'बजेट' मुस्लिमधार्जिणे!

## हिंदूंना ठेंगा, हज यात्रेपासून शाळांपर्यंत 'ओन्ली' मुस्लिम' !


। बंगळुरू। प्रतिनिधी । महाईन्यूज

**मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी कर्नाटक सरकारचे अंदाजपत्रक सादर केले आणि संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे. हिंदूंचे डोळे खाडकन् उघडले आहेत. कर्नाटकातील मुस्लिम समाजावर आर्थिक तरतुदींची खैरात करण्यात आली आहे, हे सर्वांनाच जाणवले आणि भाजपाने संताप व्यक्त करत संपूर्ण राज्यभर आंदोलने सुरू केली आहेत.**



### मुस्लिमांचे उघडपणे लांगूनचालन..

स्वातंत्र्यानंतर संपूर्ण देशावर काँग्रेसची सत्ता असताना हा पक्ष मुस्लिम समाजाचे लांगूनचालन करत होता, हे लपून राहिलेले नाही. आता, सगळीकडे भारतीय जनता पार्टीची सत्ता येत असताना कर्नाटकमध्ये मात्र सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसची सत्ता आलेली आहे.



### मुस्लिमांवर सोयीसुविधांची खैरात

त्यांच्या सरकारने यावर्षीचे अंदाजपत्रक सादर केले, आणि संपूर्ण देशातील हिंदूंचे डोळे उघडले. संपूर्ण अंदाजपत्रक हे मुस्लिमधार्जिणे असून मुस्लिम समाजावर सोयीसुविधांची खैरात करण्यात आली आहे, हे या अंदाजपत्रकाचे वैशिष्ट्य!

### हिंदू विरोध, हिंदू संस्कृतीकडे दुर्लक्ष

या अंदाजपत्रकाचा विचार करता हिंदूंचे सण, परंपरा आणि सोहळे याविषयी काँग्रेसला काहीही वाटत नाही, पण ते मुस्लिमधर्मियांचे सण मोठ्या उत्साहात साजरे करतात, ही त्यांची भूमिका अंदाजपत्रकात स्पष्ट दिसते.

### मौलवी, उद्योजक होणार मालामाल

हज यात्रा आणि मशिदींसाठी भरभरून तरतूद असून ठिकठिकाणचे मौलवी आता मालामाल होतील. त्यांचे मानधन मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आले आहे. स्टार्टअप आणि आयटीआय स्थापन करण्यापर्यंत फक्त मुस्लिमांसाठी अनेक तरतुदी आहेत. काँग्रेस सरकारने या अर्थसंकल्पात वक्फच्या संपत्तीला दीडशे कोटी रुपयांच्या वाटपाची तरतूद केली आहे. या व्यतिरिक्त अल्पसंख्यांकांच्या कुटुंबांना निकाहासाठी प्रत्येकी पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत सरकार करणार आहे.

सिद्धरामय्या सरकारच्या अंदाजपत्रकातील तरतुदी पाहिल्या, तर लक्षात येते की मुस्लिमांसाठी खास तयार केलेले हे अंदाजपत्रक आहे. सिद्धरामय्या यांना कर्नाटक हे मुस्लिम राज्य करायचे आहे.

### दहा पैकी नऊ विद्यापीठे बंद..

सिद्धरामय्या सरकारने दहा पैकी नऊ विद्यापीठे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. कर्नाटकात भाजपा सरकारने दहा विद्यापीठांची स्थापना केली होती. राज्यातील गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे, या हेतूने या दहा विद्यापीठांची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे गोरगरीब हिंदू विद्यार्थ्यांचे भवितव्य अक्षरशः अंधारमय झाले आहे.

### मुस्लिमांना चार टक्के आरक्षण

मुस्लिमांना सर्वत्र चार टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे आणि यावरून कर्नाटकमध्ये बराच गोंधळ चाललेला आहे. मशिदींच्या अध्यक्षपदी असलेल्या इमामांच्या मानधनात सहा हजार रुपयांची वाढ केली आहे.

### शिक्षण क्षेत्राचा खेळखंडोबा !

शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना सहाय्यतेच्या आधारे राज्य सरकार आता वीस लाखांवरून तीस लाखांची मदत करणार आहे. कर्नाटक सरकारने अल्पसंख्यांक बहुल भागात आयटीआय सुरू करण्याची घोषणा सुद्धा केली तसेच उर्दू माध्यम शाळांना शंभर कोटी देण्यात येणार आहेत.

## सोसायटीधारक ठरवणार,

# आवारात लिकर शॉप हवे की नको!

### आ. महेश लांडगे यांची विधानसभेत लक्षवेधी, अजित पवार यांचा सकारात्मक प्रतिसाद

। मुंबई/पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गृहनिर्माण सोसायटी, शाळा, धार्मिक स्थळे, हॉस्पिटल यासह रविवाशी क्षेत्रात वाईन शॉप, बीअर शॉप, बार आणि रेस्टॉरंट परवानगी देताना सोसायटीची 'एनओसी' बंधनकारक करण्यात येणार आहे. त्यासाठी नियमांमध्ये सुधारणा करण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.**

महाराष्ट्र अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी सोसायटींच्या आवारामध्ये लिकर शॉपला परवानगी दिल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत लक्षवेधी सूचना मांडली. त्यावर सभागृहात चर्चा झाली.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमध्ये विविध गृहप्रकल्प आहेत. त्यामधील कमर्शिअल दुकानांमध्ये लिकर शॉपचे परवाने दिले जातात. सोसायटींच्या आवारामध्ये लिकर शॉप असल्यामुळे विद्यार्थी, माता-भगिनी, ज्येष्ठ नागरिक यांना त्रास होत आहे, अशा नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमानुसार, तक्रारी दिल्यानंतर दुकान बंद करण्यात येईल, असे म्हटले आहे. मात्र, पिंपरी-चिंचवडमध्ये अनेक सोसायटींच्या आवारात देशी दारु दुकान, वाईन शॉप, बीअर बार यांना परवाने दिले आहेत. अशा ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी नागरिक दारु पिण्यासाठी बसतात. अशा परवानाधारकांवर



कारवाई करावी.

आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, मद्य विक्री दुकानाबाबत जीआर काढताना संबंधित अधिकाऱ्याने 'नापिक डोक्यातून सुपिक विचार' आला आहे.

लोकांची कितीही इच्छा असली, तरी दारु दुकान बंद करता येत नाही. एकूण मतदानापैकी 50 टक्के मतदान घेण्याचा नियम बदलून झालेल्या मतदानापैकी 75 टक्के मतदान 'आडवी बाटली' साठी झाले, तर दुकान बंद करण्याचा निर्णय घ्यावा. सामाजिक स्वास्थ याचा विचार करुन 'जीआर'मध्ये बदल केला पाहिजे.

पंतप्रधान आवास योजनेच्या आवारात बीअर बार उघडले जात आहेत. तक्रार करुन कारवाई केली जात नाही. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था दारुड्याच्या बॉटलवर उभी राहता कामा नये. याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक उत्तर दिले.

#### गृहनिर्माण सोसायटी नियमातही सुधारणा....

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, 1972 पासून नवीन लिकर परवाने दिलेले नाहीत. काही भागातील दुकानांना स्थलांतरीत करण्याचे प्रस्ताव येतात. त्याचे तपासणी होते. नगरपालिकेचा ना हरकत दाखला, ग्रामीण भागात ग्रामसभेचा ठराव घेतला जातो. महानगरपालिका परिसरात नवीन सोसायट्यांच्या आवारात गाळे काढले जातात. त्या ठिकाणी मद्य दुकाने स्थलांतरीत करण्याबाबत नियमात तरतूद नाही. सोसायटींच्या गाळ्यामध्ये कोणती दुकाने असावीत, यासाठी नियमात सुधारणा करण्यात येतील. तसेच, लिकर दुकानाचे परवाने देताना सोसायटीधारकांची 'एनओसी' घेतली जाईल. त्यासाठी नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री पवार यांनी केली.

> शाळा, कॉलेज, सोसायटी आणि धार्मिक स्थळांच्या आवारात लिकर परवाने किंवा दुकाने स्थलांतरित करण्याबाबत करण्याबाबत राज्य शासन नियमावलीत बदल करणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोसायटीधारकांच्या हितासाठी धोरणात्मक निर्णय घेतले जातील, असे आश्वासन दिले होते. एखाद्या दारु दुकानाबाबत तक्रार असल्यास त्यामध्ये नागरिकांची मते घेवून दुकान बंद करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. राज्य शासनाने सोसायटीधारक व सर्वसामान्य नागरिकांसाठी घेतलेल्या सकारात्मक निर्णयाचे स्वागत करीत आहोत.
>
> **-महेश लांडगे,**
> **आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

---

## तर मग मी त्या विरोधात भांडलो असतो

# एकनाथ शिंदे यांना पुण्यामध्ये काम वाढवायचे आहे

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि काँग्रेस नेते रवींद्र धंगेकर यांनी काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी आमदार धंगेकर यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला.यावेळी उपसभापती शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.**



२०२३ मध्ये कसबा विधानसभेच्या पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकर यांनी भाजपाच्या बालेकिल्ल्यात सध्याचे आमदार हेमंत रासने यांचा पराभव केला होता. त्यानंतर त्यांची राज्यभरात चर्चा झाली होती. मात्र,गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत धंगेकर यांना पराभव स्वीकारावा लागला होता.त्यानंतर त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आणि काल रविंद्र धंगेकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये प्रवेश केला.या पक्ष प्रवेशामुळे पुणे शहराच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.मागील पाच वर्षांच्या कालावधीत रविंद्र धंगेकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अनेक वेळा टीका केली आहे आणि रविंद्र धंगेकर यांचा महायुतीमधील शिवसेनेमध्ये प्रवेश झाल्याने,पुणे शहरातील भाजपच्या

#### आता संघर्ष होऊ नये

आता संघर्ष होऊ नये हा आमचा प्रयत्न राहणार असल्याची भूमिका यावेळी त्यांनी मांडली.२०२३ मध्ये कसबा विधानसभेच्या पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकर यांनी भाजपाच्या बालेकिल्ल्यात सध्याचे आमदार हेमंत रासने यांचा पराभव केला होता.मात्र,गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत धंगेकर यांना पराभव स्वीकारावा लागला होता.

पदाधिकारी,कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर ऐकण्यास मिळत आहे.त्याबाबत भाजपचे ज्येष्ठ मंत्री चंद्रकांत पाटील यांना विचारले असता ते म्हणाले,धंगेकर यांच्यासोबत आमचा नुसता पंगा नाही.तर आम्ही एकमेकांविरोधात निवडणुक लढवली होती. एकदा हरलो पण त्यांना दोनदा हरवल, राजकारण आणि समाजकारणामध्ये एखादी गोष्ट ही काळच्या ओघात बदलत असते,याची मानसिक तयारी असणारे आम्ही आहोत,त्याबाबत सांगायच झाल्यास तीन पक्षाचे सरकार आहे.

भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी धंगेकरांना घेण्याचा निर्णय केला असता, तर मग मी त्या विरोधात भांडलो असतो. कोणाला घ्यायचे आणि कोणाला नाही याचे स्वातंत्र्य त्या त्या पक्षाला आहे.

## अतिरिक्त जलस्त्रोत : कालवा समितीत डावलले;

# जलसंपदा मंत्र्यांनी सावरले!

## पिंपरी-चिंचवडला मुळशी धरणातून पाणी आरक्षणाचा प्रस्ताव

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी याचा विचार करता नवीन जलस्त्रोत निर्मिती ही काळाची गरज आहे. त्यासाठी मुळशी धरणातून 760 एमएलडी पाणी आरक्षण मिळावे, असा प्रस्ताव महानगरपालिका प्रशासनाने जलसंपदा विभाग आणि राज्य सरकारच्या नगरविकास विभागाला पाठवला आहे.**



वास्तविक, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने मुळशी धरणातून पाणी आरक्षणाबाबत मागणी केली आहे. या संदर्भात काही दिवसांपूर्वी पुण्यात कालवा समितीची बैठक झाली. मात्र, या बैठकीला 'पीसीएमसी' च्या अधिकाऱ्यांना निमंत्रित केले नाही.

दरम्यान, भारतीय जनता पार्टीचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी ही बाब राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. दि. 4 मार्च 2025 रोजी विखे-पाटील यांची भेट घेतली. तसेच, मुळशी धरणातून पाणी आरक्षण निश्चित करताना पुण्यासोबत पिंपरी-चिंचवडच्या प्रस्तावाचाही सकारात्मक विचार करावा, अशी आग्रही मागणी केली होती.

यावर, संबंधित विभागाची उच्चाधिकार बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन विखे-पाटील यांनी दिले होते. त्यानंतर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या निर्देशानुसार, चार दिवसांपूर्वी बैठक नियोजित केली होती. मात्र, ही बैठक झाली नाही. त्यामुळे पुन्हा दि. 10 मार्च रोजी ही बैठक नियोजित केली होती. या बैठकीला भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे, चिंचवडचे आमदार शंकर जगताप, महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### जलसंपदा मंत्र्यांचे निर्देश काय आहेत?

"कृषि सिंचनाला धक्का न लावता पुणे, पिंपरी-चिंचवडला पाणी आरक्षीत करण्यास हरकत नाही". मात्र, यासोबतच पाणी पुन:वापर किती होतो? लोकसंख्यानुसार पाण्याचा वापर किती आहे? पाणी गळती आणि चोरी रोखण्यासाठी मीटर बसवता येतील का? याबाबत विचार करावा. तसेच, चीफ वॉटर ऑडिटरच्या माध्यमातून 'वॉटर ऑडिट' करावे. डाटा व्हेरिफाय करावा. धरणाचा गाळ व इतर मेंटनन्सची कामे मार्गी लावावीत, असे आदेश विखे-पाटील यांनी दिले आहेत.

"मुंबईत राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या दालनामध्ये महापालिका, जलसंपदा विभागाचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या 2025-30 दरम्यान 35 लाखांच्या घरात असेल. पवना, आंद्रा- भामाआसखेड सोबतच नवीन जलस्त्रोत निर्मिती ही शहराची गरज आहे. त्या अनुशंगाने आम्ही पाठपुरावा करीत आहोत.

**–महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

## शहरात वाहन मुक्त उपक्रमाची "फलश्रुती"!

## व्यापाऱ्यांकडून सकारात्मक मागणी : नव्या ग्राहकांमध्ये 20 टक्क्यांनी वाढ

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी कॅम्प येथे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने वाहन मुक्त उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाला व्यापारी नागरिकांकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे. या उपक्रमामुळे 20 टक्के ग्राहकांची वाढ झाली.त्यामुळे महिन्यातून दोन वेळा वाहन मुक्त उपक्रम राबवण्यात यावा. तसेच पिंपरी कॅम्पातील मुख्य मार्ग पादचारी करण्याची मागणी देखील व्यापाऱ्यांनी केली आहे. या मागणीला आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून प्रतिसाद देण्यात आला असून लवकरच याबाबत निर्णय घेतला जाईल असे आयुक्तांनी सांगितले.**



पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी मार्केट येथे महानगरपालिकेच्या वतीने वाहन-मुक्त दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पिंपरी मार्केटमधील संपूर्ण रस्ते दोन दिवस सकाळी आठ ते रात्री नऊ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले होते. यानिमित्ताने आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी उत्स्फुर्तपणे प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. त्यामधील 'चाय पे चर्चा' या कार्यक्रमाच्या समारोप सत्रामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी वाहतूक पोलिस निरीक्षक वर्षाराणी पाटील, प्रतिनिधी डब्बू आसवानी, मराठी अभिनेते अभिज्ञा भावे, दुकानदार संघटनेचे प्रतिनिधी नीरज चावला, पुरुषोत्तम बोधवानी तसेच शहरविकास तज्ज्ञ प्रसन्न देसाई, आशिक जैन यांच्यासह स्थानिक दुकानदार व नागरिकांशी चर्चा केली. यामध्ये दुकानदार संघटनांनी महापालिकेच्या वतीने ३० आणि ३१ मार्च रोजी पुन्हा वाहन-मुक्त उपक्रम राबविण्यात यावा, बाजारपेठांचा मार्ग कायमस्वरुपी पादचारीमार्ग व्हावा, अशी विनंती आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली. यावर आयुक्त शेखर सिंह यांनी लवकरच योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील असे आश्वासन दिले. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, 'वाहन-मुक्त दिन उपक्रमासारखे उपक्रम यशस्वी होण्यासाठी समाजातील नागरिकांचा सकारात्मक पाठिंबा महत्वाचा असतो.


"वाहन-मुक्त उपक्रमादरम्यान पिंपरी मार्केटमध्ये नवीन ग्राहकांमध्ये २० टक्के वाढ झाली असून वाहनमुक्त वीकेंडमुळे व्यवसायात लक्षणीय वाढ झाली आहे. त्याचबरोबर ध्वनी, वायू प्रदूषण आणि वाहतूक कोंडी दूर झाल्यानंतर नागरिक सहजरित्या बाजाराकडे आकर्षित होतात. दुकानदार संघटनेने सुरुवातीला उपक्रमाबाबत शंका व्यक्त केली. मात्र वाहन-मुक्त दिन यांसारखे उपक्रम पादचाऱ्यांसाठी अनुकूल बाजारपेठ खरेदीला अधिक आनंददायी अनुभव बनवू शकतात आणि यामुळे व्यवसाय देखील भरभराटीला येऊ शकते

**–डब्बू आसवानी,** नागरिक प्रतिनिधी

### वाहतूक पोलिसांचे उत्तम नियोजन !

वाहन-मुक्त उपक्रम यशस्वी होण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व वाहतूक पोलिसांच्या पथकांनी वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी, दुकानदारांना सहभागी करून घेण्यासाठी दोन आठवड्यांहून अधिक काळ तयारी सुरू होती. वाहनांसाठी पार्किंगसाठी चार मोफत जागा ठरविण्यात आल्या आणि सुरळीत वाहतूकीसाठी अतिरिक्त कर्मचारी तैनात करण्यात आले. पोलीस निरीक्षक वर्षाराणी पाटील यांनी याबाबत माहिती दिली.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### अहंपणा टाकल्यास प्रपंचातील लाभ-हानी झेलता येईल

प्रपंच हा परमेश्वरप्राप्तीच्या आड कधीही येऊ शकत नाही. आपण पाहतोच की प्रपंचात आपला कितीतरी लोकांशी निरनिराळ्या स्वरूपांत संबंध येतो. आई-वडील, बायको-मुले, बहीण-भाऊ, इतर सगेसोयरे, मित्र आणि इतर जन या सर्वांचा उत्तम उपयोग करायचा असेल तर या सर्वांशी व्यवहार करताना आपण आपली सर्व कर्मे एका हरिस्मरणाच्या धाग्यात जोडून करावीत, म्हणजे सर्वांशी संबंध सलोख्याचे राहून प्रपंच फारच सुखकर होईल; निदान तो तापदायक तरी खचित होणार नाही. या सर्वांशी संबंध बिघडायला आपला अभिमान, अहंपणा, विशेषकरून कारणीभूत होत असतो. हा अभिमान श्रीमंतालाच असतो असे नव्हे तर गरिबालाही तो सोडत नाही. आपण पुराणात वाचले आहेच की, हिरण्यकश्यपूला जेव्हा भगवंतांनी मांडीवर घेऊन पोट फाडायला सुरुवात केली तेव्हा त्याचा हात अभिमानाने तलवारीकडे गेला, प्रत्यक्ष भगवंत समोर असूनही त्याने काही हात जोडले नाहीत. केवढा हा अभिमानाचा जोर ! गरीब लोकसुद्धा या अभिमानाच्या आहारी किती गेलेले असतात ! एकदा एक भिकारी एकाच्या दाराशी येऊन भिक्षा मागू लागला, तेव्हा तो गृहस्थ त्या भिकाऱ्याला म्हणाला, “अरे ! तुला काही काळवेळ समजते की नाही ?” त्यावर तो भिकारी म्हणाला, “जा जा ! मला काही तुमचे एकट्याचेच घर नाही, गावात अशी शंभर घरे आहेत !” पाहा, अभिमानाचे तण किती खोल गेलेले असते ते ! अभिमान हा शेतात उगवणाऱ्या हरळीसारखा आहे. ही हरळी समूळ नाहीशी केल्याशिवाय चांगले पीक हाती लागत नाही, त्याप्रमाणे अभिमान संपूर्णपणे नाहीसा झाल्याशिवाय परमेश्वरी कृपेचे पीक येणेच शक्य नाही. फणस चिरताना एक काळजी घ्यावी लागते; हाताला तेल लावून तो कापावा लागतो आणि त्यातले गरे काढावे लागतात, म्हणजे हाताला चिकाचा त्रास न होता गरे चटकन् निघतात. त्याप्रमाणे, नाम घेऊन प्रपंचात व्यवहार केला, तर अभिमानाचा किंवा विषयवासनांचा चीक न लागता परमेश्वरी कृपेचे गरे हस्तगत करता येतात. हा अहंपणा, हा देहाभिमान टाकला तर प्रपंचातली लाभ-हानी हसतखेळत झेलता येईल. लहान मुले पावसाळ्यात कागदाच्या लहान लहान होड्या करून पाण्यात सोडतात, त्यांतली होडी तरली तरी हसतात, बुडाली तरी हसतात; त्याप्रमाणे प्रपंचातली सुखदु:खे हसतखेळत झेलावीत; आणि हे एका नामानेच साधते.

**बोधवचन:- नामस्मरण म्हणजे ‘तू आहेस, मी नाही’ ही स्थिती होय.**

# राज, तेरी गंगा मैली हो गयी पापीयोंके पाप धोते धोते..!



**‘स्टेट’मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे ‘महाकुंभ’ प्रचंड जल्लोषात आणि उत्साहात पार पडला. तब्बल पासष्ठ कोटीपेक्षा जास्त भाविकांनी त्या पवित्र काळात मंगलमय डुबकी घेतली. तेथील प्रशासन, शिस्तबद्धता, स्वच्छता आणि अचूक नियोजन याचे संपूर्ण जगात कौतुक होत असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मात्र त्यावर टीका करून राळ उडवून घेतली आहे, हे नक्की!**



### गंगाजलाची उडवली खिल्ली..

‘महाराष्ट्र नवनिर्माण सेने’ च्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात राज ठाकरेंनी गंगाजलाची उडवलेली खिल्ली अनेकांना रुचली नाही. गंगाजलाची शुद्धता हा मुद्दा तितकासा महत्वाचा नाही. ते पाणी पिण्यायोग्य आहे किंवा नाही, हा मुद्दा स्थानिकांवर सोडून द्या. पर्यटक येत-जात असतो. तिथला मूळ निवासी माणूस त्या पाण्यावरच नित्य व्यवहार करत असतो, हे सर्वांनाच माहीत आहे.

### ‘अरे हाऽऽऽड’ म्हणून अव्हेर ...

या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा मुद्दा हा आस्था आणि भावना यांचा आहे. राजसाहेबांनी एक लक्षात घ्यावे, की तुमच्या पक्षाच्या तुमच्या सर्वाधिक जवळ असणाऱ्या नेत्याने ज्या आस्थेने ते ‘गंगाजल’ तुमच्यासाठी कमंडलूमधून आणले, त्याच नेत्याचा तुम्ही ‘अरे हाऽऽऽऽड’ असा अव्हेर करत असाल, तर तुम्ही नेते म्हणून अजूनही पक्के किंवा परिपूर्ण झाला नाहीत, हे अधोरेखित करून सिद्ध करीत आहात. आपल्याच पक्षाचे काही पदाधिकारी पक्षाचा महत्त्वाचा कार्यक्रम बुडवून कुंभमेळ्याला गेले, यात हेच दिसून आले की त्यांनादेखील कुंभमेळा महत्त्वाचा वाटला असावा पक्षाच्या कार्यक्रमापेक्षा !

### अशा राजकीय पक्षाचे भवितव्य काय?

आपल्याच पदाधिकाऱ्यांच्या धार्मिक श्रद्धा पक्षाचा अध्यक्ष म्हणून तुम्ही समजून घेत नसाल तर तो खऱ्या अर्थाने उर्वरित जनतेसाठी चिंतेचा विषय असतो. आपल्या पक्षाचा डोलारा ज्या लोकांच्या कष्टावर आणि ज्या मूठभर मतदारांच्या जोरावर आहे, त्यांच्या धार्मिक भावना आपण जपल्या पाहिजेत, याचे भान अध्यक्ष म्हणून नसेल तर भविष्य (अध्यक्षांचे आणि त्या ओघाने पक्षाचे) सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. आपण जे ‘अरे, हाऽऽड’ बोललो, ते इतर धर्मियांच्या बाबतीत बोलायचे धाडस दाखवणार का ? राज साहेबांनी याचे पण उत्तर देऊन टाकावे म्हणजे विषय संपला!

### चंद्रभागेबद्दल असेच म्हणणार का?

आषाढी एकादशीच्या वारीसाठी शेकडो मैल पायपीट करून पंढरपूरला जाणारा वारकरी चंद्रभागेचे पाणी पिण्यायोग्य आहे किंवा नाही, याचा विचार करून जात नाही. त्याला फक्त त्या अमृतस्नानाचा अनुभव घ्यायचा असतो. तुम्ही गंगाजलाबाबत जे बोलला तेच उद्या चंद्रभागेबद्दल बोलून दाखवणार का ? वारकरी तर नुसते हिंदू नाहीत तर मराठी भाषिकही आहेत, जी तुमच्या पक्षाची मूळ विचारधारा आहे. एखाद्या वारकऱ्याने आणून दिलेल्या तीर्थाबद्दल हेच उद्गार काढून दाखवणार का? ऐनवेळी सुचेल ते बोलायचे, ही राजसाहेबांची खासियत आहे, त्यामुळे त्यांचा पक्ष नेहमी अडचणीत येत असावा, तो तळागाळापर्यंत रुजत नसावा !

### मतपेटीतून तुमची खिल्ली..

मला एक हाती सत्ता द्या, एकदा अख्खा महाराष्ट्र माझ्या ताब्यात द्या, माझी विकासाची ब्लू प्रिंट तयार आहे, हे जनतेला सांगताना त्याच जनतेच्या धार्मिक भावना पायदळी तुडवायच्या असतील, तर मत मागायला गेल्यावर मतदार सुद्धा ‘अरे हाऽऽड’ च म्हणतील, हे लक्षात ठेवा. तुमच्याच पक्षाच्या नेत्यांची आणि मतदारांची जाहीर खिल्ली उडवली तर जनता मतपेटीतून तुमची खिल्ली उडवते, हा ताजा इतिहास आहे. धर्म ही ‘अफूची गोळी’ आहे, ही मार्क्सवाद्यांची विचारधारा बासनात गुंडाळून त्याच पक्षाच्या सर्वोच्च नेत्याने अर्थात सीताराम येचुरी यांनी हैदराबादमधील महाकाली उत्सवात डोक्यावर पुष्पकलश घेऊन शोभायात्रेत हजेरी लावली होती. कारण मतदारांची धार्मिक भावना त्यांनी लक्षात घेतली. तोपर्यंत पक्षाचा बाजार उठला होता, हे येचुरी यांनी देखील मान्य केले होते.

### मतदारांचे अंगविक्षेप करणे हास्यास्पद

त्याच मतदारांचे अंगविक्षेप व्यासपीठावर करून दाखवले, तर तेच पाप बोकांडी बसते. आपल्या पक्षाकडे कोणताही ठोस कार्यक्रम नाही, दुसऱ्या फळीतील नेते तयार नाहीत आणि जे आहेत त्यांची आपण थट्टा करतोय, याचे भान टाळ्या मिळवायच्या भानगडीत सर्वोच्च नेतृत्वाला नसले तरी मतदाराने जे ठरवायचे ते मनोमन ठरवले आहे. योग्य वेळेची तो वाट बघत असतो, हे १९ व्या वर्धापनदिनाला सुद्धा या मोठ्या नेत्याला समजू शकत नाही ही खरी शोकांतिका आहे.

### महाराष्ट्राचे, मराठी माणसाचे दुर्दैव!

महाराष्ट्राला, मराठी माणसाला आपल्या हक्काचा पक्ष मिळाला म्हणून १९ वर्षांपूर्वी आनंद झाला होता त्याने जल्लोष साजरा केला होता, पण कायम स्वैर भूमिका, प्रत्येक निवडणुकीवेळी असेच घुमजाव यामुळे पक्षाची ही दैन्यावस्था आली आहे, हे राजसाहेबांना कुणीतरी सांगायला हवे.. पण ज्यांनी सांगायचे, त्यांनाच त्यांनी ‘हाड’ केले आहे, हे मोठे दुर्दैव !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांवर होणार कारवाई!

## मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत निर्गमित केल्या सूचना

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कामकाजात आज विधानसभेत धार्मिक स्थळांवरील भोंग्यांच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला असून यापुढे रात्री 10 ते पहाटे 6 वाजेपर्यंत सर्व धार्मिक स्थळांवरील भोंगे बंद ठेवलेच पाहिजे अशा सूचना केल्या आहेत.**



### नियमात बदल करणार

रात्री 10 ते पहाटे 6 वाजेपर्यंत भोंगे बंद ठेवलेच पाहिजे. या प्रकरणी कुणालाही सरसकट भोंग्यांची परवानगी देणार नाही. सर्वांना भोंग्यांच्या आवाज मर्यादेचे पालन करावे लागेल. एका ठराविक कालावधीसाठी भोंग्यांची परवानगी दिली जाईल. भोंग्यांच्या आवाजाच्या परवानगीची तपासणी करण्याची जबाबदारी पीआयची असेल. दिवसा 55 डेसीबल आणि रात्री 45 डेसीबल इतकीच आवाजाची मर्यादा असेल, असे फडणवीस म्हणाले. मुंबईसह महाराष्ट्रातील विविध भागातील प्रार्थना स्थळ, मशिदींवरील भोंग्यामुळे ध्वनी प्रदूषण होत असल्याचा मुद्दा विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी उपस्थित केला होता.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, रात्री 10 ते पहाटे 6 वाजेपर्यंत भोंगे बंद ठेवलेच पाहिजे. या प्रकरणी कुणालाही सरसकट भोंग्यांची परवानगी देणार नाही. सर्वांना भोंग्यांच्या आवाज मर्यादेचे पालन करावे लागेल. एका ठराविक कालावधीसाठी भोंग्यांची परवानगी दिली जाईल. भोंग्यांच्या आवाजाच्या परवानगीची तपासणी करण्याची जबाबदारी पीआयची असेल. दिवसा 55 डेसीबल आणि रात्री 45 डेसीबल इतकीच आवाजाची मर्यादा असेल, असे फडणवीस म्हणाले. मुंबईसह महाराष्ट्रातील विविध भागातील प्रार्थना स्थळ, मशिदींवरील भोंग्यामुळे ध्वनी प्रदूषण होत असल्याचा मुद्दा विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी उपस्थित केला होता.

मुंबई उच्च न्यायालयाने २५ जानेवारी २०२५ रोजी आदेश देऊन मशिदींसह प्रार्थना स्थळांकडून ध्वनी प्रदूषण प्रतिबंध नियमांचे उल्लंघन होणार नाही, असे आदेश दिले होते. मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही, हा मुद्दा भाजपाच्या आमदार देवयानी फरांदे यांनी मंगळवारी विधानसभेत लक्षवेधी सुचनेद्वारे मांडला. उत्तर प्रदेश सरकारने ज्याप्रकारे भोंग्यावर कारवाई केली आहे, त्याप्रमाणे राज्य सरकारही कारवाई करणार का? असा प्रश्न आमदार फरांदे यांनी विचारला होता.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर उत्तर दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कुठल्याही प्रार्थनास्थळावर भोंगे लावण्याआधी परवानगी घेतली पाहिजे. रात्री १० वाजल्यापासून सकाळी ६ वाजेपर्यंत भोंगे बंद असले पाहिजेत. सकाळी ६ ते रात्री १० वाजण्याच्या कालावधीत दिवसा ५५ डेसिबल आणि रात्री ४४ डेसिबलची आवाज मर्यादा असली पाहिजे. कायद्यानुसार अधिक डेसिबलने भोंगे वाजत असतील तर त्यावर कारवाई करण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला केंद्रीय कायद्याने दिले आहेत. पोलिसांनी याची दखल घेऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाला कळवायचे आहे, अशी सध्या कायद्याची तरतूद आहे. मात्र याचा अवलंब सध्या होताना दिसत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, यापुढे कुणालाही सरसकट भोंग्यांची परवानगी देण्यात येणार नाही. निश्चित कालावधीकरताच भोंगे लावता येतील. त्यानंतर पुन्हा भोंगे लावायचे असल्यास संबंधितांनी पुन्हा पोलिसांकडून परवानगी घ्यावी. ज्याठिकाणी आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन होईल, त्यांना पुन्हा परवानगी दिली जाणार नाही. भोंग्यांची जप्ती केली जाईल. तसेच या नियमांचे तंतोतंत पालन होत आहे की नाही? हे पाहण्याची जबाबदारी पोलीस निरीक्षकाची असेल. जर पोलीस निरीक्षकांनी याचे तंतोतंत पालन केले नाही, तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असेही मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्षवेधीचे उत्तर देताना स्पष्ट केले. पोलीस निरीक्षकाने प्रत्येक प्रार्थना स्थळात जाऊन भोंग्याची परवानगी घेतली आहे की नाही? याची तपासणी केली पाहिजे. भोंग्याचे डेसिबल मोजून आवाजाची मर्यादा ओलांडली असेल तर पहिल्या टप्प्यात प्रदूषण नियंत्रक मंडळाला सांगणे आणि दुसऱ्या टप्प्यात पुन्हा परवानग्या न देण्याचा मार्ग अवलंबला पाहिजे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# भाजपाच्या त्रासामुळे काँग्रेस सोडली

## खासदार संजय राऊतांच्या दाव्यावर रवींद्र धंगेकरांचे स्पष्टीकरण

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कसबा पेठ येथील भूखंडावरून भाजपाकडून त्रास होतोय, मात्र त्या कारणामुळे मी काँग्रेस सोडली नाही", अशा शब्दांत माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत यांच्या दाव्यावर स्पष्टीकरण दिलं आहे.**



### काय म्हणाले रवींद्र धंगेकर

धंगेकर म्हणाले, "भाजपाच्या त्रासाला मी शून्य टक्के देखील घाबरत नाही." माजी आमदार धंगेकर म्हणाले, "कसबा पेठेतील ती जागा मी घेतली असती तर मुस्लीम समुदायाला दुख झालं असतं. परंतु, इथे दुख भाजपा नेत्यांना होतंय. म्हणून ते वक्फ बोर्डाला पुढे करत आहेत. मात्र त्या वक्फ बोर्डाच्या प्रक्रियेत स्थगिती मिळाली आहे.

धंगेकर म्हणाले, "संजय राऊत माझ्यासाठी बोलले असतील किंवा त्यांनी माझी बाजू मांडली असेल." रवींद्र धंगेकर यांनी सोमवारी (१० मार्च) काँग्रेस पक्षाला रामराम करत शिवसेनेत (शिंदे) जाहीर प्रवेश केला आहे. "भाजपाच्या त्रासामुळेच धंगेकर काँग्रेस सोडून शिवसेनेत गेले", असा दावा संजय राऊत यांनी केला होता. त्यावर धंगेकर यांनी भाष्य केलं आहे. धंगेकर म्हणाले, "भाजपाच्या त्रासाला मी शून्य टक्के देखील घाबरत नाही." माजी आमदार धंगेकर म्हणाले, "कसबा पेठेतील ती जागा मी घेतली असती तर मुस्लीम समुदायाला दुख झालं असतं. परंतु, इथे दुख भाजपा नेत्यांना होतंय. म्हणून ते वक्फ बोर्डाला पुढे करत आहेत. मात्र त्या वक्फ बोर्डाच्या प्रक्रियेत स्थगिती मिळाली आहे. आम्ही ते प्रकरण उच्च न्यायालयात नेल्यानंतर तिथे आम्हाला स्थगिती मिळाली.आम्ही संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया राबवली होती. मी भाजपाच्या त्रासाला शून्य टक्के देखील घाबरत नाही. तो विषय सात-आठ महिन्यांपासून चालू आहे."शिवसेना प्रवेशानंतर धंगेकर यांनी टीव्ही ९ मराठीशी बातचीत केली. यावेळी त्यांना विचारण्यात आलं की संजय राऊत यांच्या दाव्याप्रमाणे तुम्ही भाजपाच्या त्रासाला कंटाळून पक्ष सोडला का? त्यावर धंगेकर म्हणाले, "नाही, त्या लोकांनी माझ्या पत्नीला अटक करण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला. मात्र आम्ही घाबरत नाही." भाजपाने तुमची कोंडी केल्यामुळे तुम्ही शिवसेनेत (शिंदे) प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचा दावा केला जात आहे. त्यावर काय सांगाल असा प्रश्न विचारल्यावर धंगेकर म्हणाले, "ते संजय राऊत यांचं मत आहे. ते माझ्यासाठी बोलले असतील. किंवा त्यांनी माझी बाजू मांडली असेल. परंतु, ते त्यांचं मत आहे. मी घाबरलो नाही. मी स्पष्ट सांगितलं आहे की आमची चूक असेल तर खुशाल आम्हाला तुरुंगात टाका. परंतु, मी कधी चुकीचं काम केलंच नाही. त्यामुळे मला भिती वाटत नाही."“संजय राऊत माझ्यासाठी बोलले असतील किंवा त्यांनी माझी बाजू मांडली असेल." रवींद्र धंगेकर यांनी सोमवारी (१० मार्च) काँग्रेस पक्षाला रामराम करत शिवसेनेत (शिंदे) जाहीर प्रवेश केला आहे. "भाजपाच्या त्रासामुळेच धंगेकर काँग्रेस सोडून शिवसेनेत गेले", असा दावा संजय राऊत यांनी केला होता.

# बलोचिस्तानचा पाकिस्तानला गंभीर इशारा!

## पाकिस्तानमध्ये पूर्ण रेल्वेच 'हायजॅक'; 450 जण ओलीस!

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**पाकिस्तानात दहशतवाद्यांनी ट्रेन हायजॅक केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बलुचिस्तानची राजधानी क्वेट्टापासून १०० किलोमीटर अंतरावर असलेल्या बोलान स्टेशनवर बलुच लिबरेशन आर्मीच्या दहशतवादवाद्यांनी बंदुकीच्या जोरावर ट्रेन हायजॅक केल्याची माहिती आहे. या घटनेची जबाबदारी घेत बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी सुरक्षा दलाचे सहा सैनिक मारल्याचाही दावा केला आहे.**



पाकिस्तानमधील परिस्थिती दिवसंदिवस गंभीर होत आहे. पाकिस्तानमधील बलोच आर्मीने संपूर्ण ट्रेनच हायजॅक केली. दहशतवादवाद्यांनी रेल्वेतील 450 जणांना ओलीस ठेवले होते. त्यानंतर रेल्वेत असणाऱ्या इतर सर्व प्रवाशांना सोडून देण्यात आले. परंतु 140 सैनिक, आयएसआय कर्मचारी आणि पोलिसांना ओलीस ठेवले आहे. त्यात आयएसआय आणि पाकिस्तानी लष्कराचे कर्मचारी आहेत. रेल्वेला अपहरणकर्त्यांकडून सोडवण्यासाठी गेलेल्या पाकिस्तानी लष्करातील सहा सैनिकांचा मृत्यू झाला आहे. सैन्य कारवाई केली तर प्रवाशांना ठार करण्यात येईल, असा इशारा बलोच आर्मीने दिला आहे. ओलिसांमध्ये पाकिस्तानी लष्कर, पोलीस, दहशतवाद विरोधी दल (एटीएफ) आणि इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजन्स (आयएसआय) चे कर्मचारी आहेत. हे सर्वजण रजेवर पंजाबला जात होते. ट्रेनमध्ये उपस्थित सैनिकांनी कोणतीही कारवाई करण्याचा प्रयत्न केल्यास सर्व ओलीस ठार केले जातील, असा इशारा बीएलएने दिला आहे. त्यामुळे सध्या पाकिस्तानात एकच दहशत पसरली आहे. रेल्वे हायजॅक केल्यानंतर बलोचिस्तान लिबरेशन आर्मीने वक्तव्य दिले आहे. आमच्या सैनिकांनी आधी ट्रेनचे ट्रॅक बॉम्बने उडवले. त्यामुळे रेल्वे थांबली. रेल्वे थांबताच आमच्या सैनिकांनी संपूर्ण नियंत्रण घेतले. पाकिस्तानी लष्कर काही कारवाई करण्याचा विचार करत असेल तर ओलीस ठेवलेले 140 प्रवाशी वाचणार नाही. बलोच आर्मीने पाकिस्तान लष्कराला गंभीर इशारा दिला आहे. आमच्याविरोधात लष्करी कारवाई केली तर त्याचे गंभीर परिणाम होतील. आमच्यावर हल्ला झाला तर सर्व 140 प्रवाशी मारले जातील. त्याची संपूर्ण जबाबदारी पाकिस्तानी लष्कराची असणार आहे. बलुचिस्तानमधील फुटीरतावादी संघटना अनेक दिवसांपासून पाकिस्तानविरोधात लढा देत आहेत.जिथे पाकिस्तान सरकारवर सातत्याने हल्ले होत आहेत. काही दिवसांपूर्वी बलुच गटांनी पाकिस्तान आणि चीनविरोधात नव्याने हल्ला करण्याची घोषणा केली होती. बलुच गटाने अलीकडेच सिंधी फुटीरतावादी गटांसोबत युद्ध सराव पूर्ण केला होता. बलुचिस्तानमध्ये बीएलएच्या कारवायांना मोठं समर्थन मिळालं आहे. मात्र, येथील लोक उघडपणे बलुच लिबरेशन आर्मीला पाठिंबा देताना दिसत नाहीत. जेव्हा बीएलए उदयास येऊ लागली तेव्हा त्यांच्याशी चर्चा करुन समस्येचं निवारण करण्याऐवजी २००६ मध्ये पाकिस्तान सरकारने या संघटनेवर बंदी घातली. तेव्हापासून बीएलए पाकिस्तान सरकारच्या अधिकाऱ्यांना लक्ष्य करत आहे. बलुच लिबरेशन आर्मीची रचनुसार अनेक स्तरावर वेगवेगळ्या प्रमुखांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही संघटना सर्वाधिक काळ चालवणाऱ्यांमध्ये अस्लम बलुचचं नाव आघाडीवर आहे. बलुचिस्तान लिबरेशन आर्मीची स्थापना २००० मध्ये करण्यात आली होती. स्थापनेपासूनच बीएलएने पाकिस्तानमध्ये अनेक हल्ले केले आहेत. बलुचिस्तानला पाकिस्तानपासून वेगळा स्वायत्त प्रदेश किंवा देश बनवण्यासाठी बीएलएची स्थापना करण्यात आली होती. बीएलएमध्ये ६००० बलुच बंडखोर सहभागी आहेत. स्वायत्त बलुचिस्तानबाबत पाकिस्तानमध्ये जवळपास सात दशकांपासून संघर्ष सुरू आहे. या काळात या प्रदेशात अनेक बलुच संघटना उदयास आल्या. यापैकी बीएलए सर्वात मजबूत आणि अधिक काळ अस्तित्वात असलेली संस्था आहे. बीएलए मध्ये अनेक बंडखोर सहभागी झाले आहेत, हे सर्व शस्त्र हाताळणी आणि पारंपारिक युद्धात तज्ञ आहेत. या संघटनेला बुगटी, मेंगल आणि मारी समुदाय तसेच बलुचिस्तानमध्ये राहणारे इतर समुदायांचाही पाठिंबा आहे.

### मॉस्कोमध्ये प्रशिक्षण

पाकिस्तानपासून वेगळे बलुचिस्तानची चळवळ ही सोव्हिएत युनियन आणि कट्टर मार्क्सवादी विचारसरणीपासून प्रेरित असल्याचं म्हटलं जातं. बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या अनेक बंडखोरांना मॉस्कोमध्ये प्रशिक्षणही देण्यात आले आहे. बलुचिस्तान लिबरेशन आर्मी या प्रदेशाच्या स्वातंत्र्यासाठी या विचारसरणीने प्रेरित असल्याचं सांगितलं जातं.

# देशात स्वाइन फ्लूचा धोका वाढला!

## 16 राज्यांमध्ये 6 मृत्यू; 20,414 जणांना स्वाइन फ्लूची लागण

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**कोरोना महामारीच्या संकटानंतर आता भारतात स्वाइन फ्लू पुन्हा एकदा हातपाय पसरवत असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. देशातील तब्बल 16 राज्यांमध्ये स्वाइन फ्लूच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. तसेच 8 राज्यांमध्ये तो झपाट्याने वाढत असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.**




प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे. याबाबत राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्रचा रिपोर्ट समोर आला आहे. या रिपोर्टनुसार, देशात जानेवारी 2025 मध्ये 16 राज्यांमध्ये 516 बाधित रुग्ण आढळले आहेत. यापैकी 6 जणांचा मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे यापैकी सर्वाधिक मृत्यू केरळमध्ये झाले आहेत. केरळमध्ये 4 रुग्णांचा स्वाइन फ्लूने मृत्यू झाला आहे. तर कर्नाटक आणि हिमाचल प्रदेशात प्रत्येकी एक-एक रुग्णाचा मृत्यू झाला आहे. राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राच्या रिपोर्टनुसार, 2024 मध्ये देशात 20,414 जणांना स्वाइन फ्लूची लागण झाली होती. यामध्ये 347 रुग्णांचा मृत्यू झाला होता. रिपोर्टनुसार, देशात 2019 मध्ये सर्वाधिक 28,798 रुग्ण आढळले होते. त्यापैकी 1,218 रुग्णांचा मृत्यू झाला होता. या आजारावर नियंत्रण यावं यासाठी केंद्र सरकारकडून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. केंद्र सरकारने यासाठी टास्क फोर्सची निर्मिती केली आहे. या टास्क फोर्समध्ये आरोग्य मंत्रालय, एनसीडीसी, आयसीएमआर, दिल्ली एम्स, पीजीआय चंदीगड, निम्हांस बंगलुरु, विज्ञान विभागासह विविध मंत्रालयांचे वरिष्ठ अधिकारी सामील आहेत. राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राने तामिळनाडू, पदुचेरी, केरळ, महाराष्ट्र, जम्मू-काश्मीर, गुजरात, कर्नाटक आणि दिल्ली येथे सर्वाधिक काळजी घेण्याचं आणि निरीक्षण ठेवण्याचा सल्ला सूचवला आहे. रिपोर्टनुसार, जानेवारी महिन्यात तामिळनाडूत 209, कर्नाटकात 76, केरळमध्ये 48, जम्मू-काश्मीरमध्ये 41, दिल्लीत 40, पदुचेरीत 32, महाराष्ट्रात 21 आणि गुजरातमध्ये 14 बाधित रुग्ण आढळले आहेत.

### स्वाइन फ्लूची लक्षणे काय?

एच1SV1 हा इन्फ्लूएंजा व्हायरस आहे. त्यालाच स्वाइन फ्लू देखील म्हटलं जातं. ताप, थकवा, भूक न लागणं, खोकला, गळ्यात खवखव, मळमळ, उलटी, अतिसार अशी अनेक स्वाइन फ्लूची लक्षणे आहेत. हा आजार देखील कोरोनासारखा एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीला होतो. तसेच या आजाराचा विषाणू हा श्वसन प्रक्रियेवर हल्ला करतो.

# अमिताभ बच्चन यांना यंदाचा लता मंगेशकर पुरस्कार

बॉलीवूडचे महानायक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमिताभ बच्चन यांचा जलवा अजूनही कायम आहे. त्यांना ही नावं आणि प्रसिद्धी इतक्या सहजासहजी मिळाली नाहीत. प्रत्येक कलाकारांच्या वाटेला संघर्ष असतोच. तसाच बिग बींना देखील करिअरच्या सुरुवातीपासूनच खूप संघर्ष करावा लागला. या सिनेसृष्टीत त्यांना जवळपास पाच दशक पूर्ण झाली आहेत. या पाच दशकात त्यांनी अनेक हिट चित्रपट दिले आहेत. त्यामुळे सिनेसृष्टीतील बिग बींच्या या कारकीर्दीबद्दल आणि योगदानाबद्दल यंदा त्यांना लता दीनानाथ मंगेशकर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. गेल्यावर्षी लता दीनानाथ मंगेशकर हा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रदान करण्यात आला होता. यंदा हा पुरस्कार अमिताभ बच्चन यांना जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्राचा मानाचा पुरस्कार सोहळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृती पुरस्कार सोहळ्याची आज घोषणा झाली. पंडित हृदयनाथ मंगेशकर, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आणि आदिनाथ मंगेशकर यांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळ्याची घोषणा करण्यात आली. दीनानाथ मंगेशकर यांच्या ८२व्या पुण्यतिथीनिमित्ताने एप्रिलला हा पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. दीनानाथ नाट्यगृह येथे हा सोहळा रंगणार आहे. या सोहळ्यात अमिताभ बच्चन यांच्यासह संगीत, नाटक, कला, वैद्यकीय, पत्रकारिता व सामाजिक कार्य क्षेत्रातील दिग्गजांचा सत्कार होणार आहे.

# यंदाची सर्वोत्कृष्ट रोमँटिक जोडी कोण ठरली?

छोट्या पडद्यावर काम करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी पुरस्कार सोहळे आयोजित केले जातात. 'स्टार प्रवाह परिवार' पुरस्कार सोहळ्याची सध्या सर्वत्र चर्चा चालू आहे. यंदा या सोहळ्याचं पाचवं वर्ष आहे. यानिमित्ताने या कार्यक्रमाला ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, 'धकधक गर्ल' माधुरी दीक्षित, अभिनेते व निर्माते महेश कोठारे अशा अनेक दिग्गज कलाकारांनी उपस्थिती लावली होती. 'स्टार प्रवाह' पुरस्कार सोहळ्यात आपल्या आवडत्या कलाकारांना पुरस्कार मिळाला की नाही? याची उत्सुकता सध्या सर्व चाहत्यांच्या मनात निर्माण झाली आहे. या सोहळ्याचं प्रक्षेपण येत्या १६ मार्चला टीव्हीवर करण्यात येणार आहे. याचवेळी प्रेक्षकांना विजयी कलाकारांची नावं समजतील. पण, त्याआधीच सोशल मीडियावरील व्हायरल फोटोंमुळे काही पुरस्कारांचे मानकरी आधीच प्रेक्षकांसमोर आले आहेत.काही दिवसांपूर्वीच 'प्रेमाची गोष्ट' मालिकेत मुक्ताची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री स्वरदा ठिगळेने शेअर केलेल्या फोटोमुळे तिला यंदा 'सर्वोत्कृष्ट पत्नी'चा पुरस्कार मिळाल्याचं प्रेक्षकांसमोर आलं होतं. पण, आता सर्वोत्कृष्ट रोमँटिक जोडी हा आणखी एक महत्त्वाचा पुरस्कार कोणी जिंकलाय हे पुरस्कार सोहळ्याच्या प्रक्षेपणाआधीच उघड झालं आहे.'स्टार प्रवाह' वाहिनीवर सध्या एकूण १४ मालिका ऑन एअर आहेत. आता यापैकी सर्वोत्कृष्ट रोमँटिक जोडी होण्याचा बहुमान कोणाला मिळणार याची उत्सुकता प्रेक्षकांच्या मनात निर्माण झाली होती. अखेर एका व्हायरल फोटोतून, यंदा 'मुरांबा' मालिकेतील अक्षय-रमाने 'सर्वोत्कृष्ट रोमँटिक जोडी' या पुरस्कारावर आपलं नाव कोरल्याचं समोर आलं आहे.

# रंग बरसेवर पूर्वा कौशिकचा भन्नाट डान्स



मालिका या मनोरंजनातील महत्वाचा भाग आहे. विविध वाहिन्यांवर विविध कथा असलेल्या मालिका प्रेक्षकांच्या दररोज भेटीला येतात. या मालिकेत येणारे ट्विस्ट प्रेक्षकांना खिळवून ठेवत असतात. अनेकदा या मालिकांचे महासंगम असतात. त्यावेळी दोन किंवा त्याहून अधिक मालिकांतील कलाकार एकत्र काम करताना दिसतात. आता झी मराठी वाहिनीवरील कलाकार होळीच्या निमित्ताने एकत्र आले आहेत. त्यांच्या डान्सचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल होताना दिसत आहेत. 'मराठी मनोरंजन विश्व' या सोशल मिडिया अकाउंटने सोशल मीडियावर असाच एक व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये झी मराठी वाहिनीवर प्रदर्शित होणाऱ्या शिवा या मालिकेतील कलाकार डान्स करताना दिसत आहेत. अमिताभ बच्चन यांच्या गाजलेल्या 'रंग बरसे' या गाण्यावर शिवासह इतर कलाकारांनी ठेका धरल्याचे दिसत आहे. यामध्ये सावळ्याची जणू सावलीमधील सावली-सारंग, नवरी मिळे हिटलरला मालिकेतील सरस्वती-लक्ष्मी, लाखात एक आमचा दादा मालिकेतील राजश्री, धनश्री, तेजश्री असे सर्व कलाकार या व्हिडीओमध्ये दिसत आहे.

# क्रिती खरबंदाच्या व्हिडीओची चर्चा

बॉलीवूड कपल पुलकित सम्राट आणि क्रिती खरबंदा यांचा विवाहसोहळा १५ मार्चला थाटामाटात पार पडला. पुलकित-क्रितीने मानेसरमध्ये लग्नगाठ बांधली. पुलकित-क्रितीच्या लग्नसोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले होते. १५ एप्रिलला पुलकित-क्रितीच्या लग्नाला एक महिना पूर्ण झाला. या निमित्ताने दोघांनी आपल्या सोशल मीडियावर लग्नसोहळ्यातील काही क्षण शेअर केले आहेत. नवरीची मंडपात एंट्री होताच पुलकितचे अश्रू अनावर झाले. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होतोय. क्रिती आणि पुलकितने या खास दिवशी एकमेकांसाठी छोटसं स्पीच तयार केलं होतं. यात त्यांनी एकमेकांबद्दल खूप सुंदर गोष्टी लिहिल्या होत्या. आपल्या भावना व्यक्त करत असताना दोघांचेही डोळे पाणावले होते.सप्तपदीच्या आधी पुलकित क्रितीला भेटायला आला होता. तेव्हा "ब्राईड ओ ब्राईड" अशी हाक मारत त्याने क्रितीला बोलावलं. पुलकितच्या हाकेनंतर क्रिती बाहेर आली आणि तिने त्याला घट्ट मिठी मारली.क्रितीने याचा व्हिडीओ तिच्या अधिकृत सोशल मीडियावर शेअर केला आहे. "जेव्हा आम्ही एकमेकांना शोधलं, तेव्हा खरंतर आम्ही स्वतःला शोधलं आणि हे सर्वात सुंदर प्रकारचं प्रेम आहे. आता तर लग्नाला एक महिना झाला आहे, पण कायम आयुष्य एकत्र जगण्याची सुरुवात खूप आधीपासूनच सुरू झाली आहे."क्रितीने लग्नाचे फोटो आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केले होते. लग्नासाठी क्रितीने बेबी पिंक रंगाचा लेहेंगा निवडला होता, तर पुलकितने या खास दिवसासाठी ऑलिव्ह ग्रीन रंगाची शेरवानी परिधान केली होती. पुलकितच्या शेरवानीची खासियत म्हणजे यावर संस्कृतमध्ये मंत्र लिहिलेले होते. सुंदर कॅप्शन देत क्रितीने हे लग्नाचे फोटो शेअर केले होते. क्रितीने लग्नाचे फोटो शेअर केल्यानंतर बॉलीवूड कलाविश्वातून शुभेच्छांचा वर्षाव झाला होता.दरम्यान, पुलकित व क्रितीबद्दल सांगायचं झाल्यास मागच्या काही वर्षांपासून ते एकमेकांना

# स्टार प्रवाह पुरस्कार सोहळ्यात माधुरी



'धकधक गर्ल' माधुरी दीक्षितची निर्मिती असलेला 'पंचक' सिनेमा थिएटरनंतर आता 'स्टार प्रवाह' वाहिनीवर प्रदर्शित होणार आहे. यानिमित्ताने यंदा पार पडलेल्या 'स्टार प्रवाह परिवार' पुरस्कार सोहळ्याला माधुरी दीक्षितने उपस्थिती लावली होती. माधुरी मखमली साडी आणि गळ्यात मोत्याचा नेकलेस घालून सुंदर अशा इंडो-वेस्टर्न लूकमध्ये या सोहळ्याला उपस्थित राहिली होती. तिच्या एन्ट्रीने सगळेच भारावून गेल्याचं पाहायला मिळालं. 'स्टार प्रवाह परिवार' पुरस्कारांचं यंदा पाचवं वर्ष आहे. गेल्या काही दिवसांपासून अवघा महाराष्ट्र या सोहळ्याची आतुरतेने वाट पाहत आहे. आपल्या अभिनय आणि नृत्याने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी धकधक गर्ल 'स्टार प्रवाह' परिवार पुरस्कारांच्या रेड कार्पेटवर अवतरली आणि आपल्या अदाकारीने तिने सर्वांची मनं जिंकून घेतली.माधुरी आणि तिचं नृत्यावरील प्रेम सर्वश्रूत आहेच. तिच्याकडून नृत्याचे धडे घेणं म्हणजे पर्वणीच. साक्षात माधुरीसमोर नृत्यकला सादर करण्याची संधी 'स्टार प्रवाह'च्या कलाकारांना मिळाली. 'स्टार प्रवाह' परिवारातल्या एका लकी सदस्याला माधुरीकडून एक खास भेटवस्तू मिळणार आहे. हा लकी सदस्य कोण? आणि या लकी सदस्याला नेमकं काय मिळणार? हे आपल्याला १६ मार्च रोजी प्रक्षेपित केल्या जाणाऱ्या 'स्टार प्रवाह पुरस्कार' सोहळ्यात पाहता येणार आहे.माधुरी दीक्षितला माध्यमांशी संवाद साधताना "छोट्या पडद्यावर म्हणजेच मालिकांमध्ये काम करायला आवडेल का?" असा प्रश्न विचारण्यात आला. यावर धकधक गर्ल म्हणाली, "मोठा आणि छोटा पडदा असं काही नसतं. मनोरंजन हे सगळ्या माध्यमातून होतं. मी तर, ओटीटीवर सुद्धा काम केलंय. मला करिअरमध्ये नेहमीच नवनवीन संधी मिळाल्या त्यामुळे यासाठी रोज मी देवाचे आभार मानते. त्यामुळे कोणत्याही माध्यमांवर काम करण्यास मी तयार आहे. सध्या मराठीमधल्या कामाबद्दल बोलायचं झालं, तर माझा 'पंचक' सिनेमा टेलिव्हिजनवर रिलीज होतोय त्यावर माझं सगळं लक्ष आहे."तसेच "मराठी मालिकांची निर्मिती करायला आवडेल का?" यावर "हो जरूर का नाही आवडणार, मी नक्की निर्मिती करेन." असं उत्तर माधुरीने दिलं

आहे.'धकधक गर्ल' माधुरी दीक्षितची निर्मिती असलेला 'पंचक' सिनेमा थिएटरनंतर आता 'स्टार प्रवाह' वाहिनीवर प्रदर्शित होणार आहे.

# दिल्लीचा संघ थेट फायनलमध्ये!

## आरसीबीने अखेरच्या सामन्यात मुंबईवर विजय मिळवला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अखेरच्या साखळी सामन्यात मुंबई इंडियन्सला पराभवाला सामोरे जावे लागले आहे. सलग पाच सामने गमावलेल्या गतविजेत्या आरसीबीच्या संघाने मुंबईवर ११ धावांनी मोठा विजय नोंदवला. यासह मुंबई इंडियन्सचा संघ मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर आजवर एकही सामना गमावला नव्हता, पण आरसीबीने मुंबईचा ११ धावांनी पराभव करत एक मोठा ऐतिहासिक विजय मिळवला. या सामन्यात विजय नोंदवत मुंबई इंडियन्सला थेट फायनलचे तिकिट मिळवण्याची संधी होती, पण आरसीबीने मुंबईच्या प्रयत्नांवर पाणी फेरलं.**



अखेरच्या षटकात मुंबईला विजयासाठी २८ धावांची गरज होती. सजना सजीवनने २ षटकार लगावत संघाच्या विजयाच्या आशा उंचावल्या. पण पाचव्या चेंडूवर झेलबाद होत आरसीबीने सामन्यात पुनरागमन करत एलिस पेरीने संघाला विजय मिळवून दिला. मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबई इंडियन्स संघाला खराब फिल्डिंगचा फटका बसला. संघाने अनेक झेल सोडले तर सीमारेषेजवळ चौकार अडवण्यातही खेळाडू अपयशी ठरले. यासह आरसीबीकडून मेघना आणि स्मृती मानधनाने संघाला वादळी सुरूवात करून दिली.

एस मेघनाने २६ धावा तर स्मृती मानधनाने३७ चेंडूक ३ षटकार आणि ६ चौकारांसह अर्धशतक करत ५३ धावा केल्या. तर एलिस पेरी ४९ धावा करत नाबाद परतली. आरसीबीच्या प्रत्येक खेळाडूने संघाच्या धावांमध्ये मोठी भर घातली. पेरीनंतर रिचा घोषने ३६ धावा आणि जॉर्जिया वेयरहमने ३१ धावांची शानदार खेळी करत १९९ धावा केल्या आणि मुंबईला २०० धावांचे आव्हान दिले.

आरसीबीने दिलेल्या २०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सने ९ विकेट्स गमावत १८८ धावा केल्या. पण लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईला चांगली सुरूवात मिळाली नाही आणि स्नेह राणाने मुंबईच्या दोन्ही सलामीवीरांना स्वस्तात माघारी धाडले. हिली मॅथ्यूज १९ धावा तर अमेलिया कर ९ धावा करत बाद झाली. यानंतर संघाला मोठा धक्का हरमनप्रीत कौरच्या रूपात लागला. हरमनप्रीत कौर २० धावा करत लवकर बाद झाली. तर नॅट स्किव्हर ब्रंटने उत्कृष्ट ३५ चेंडूत २ षटकार आणि ९ चौकारांसह उत्कृष्ट ६९ धावांची खेळी केली. तर सजना सजीवन २३ धावा करू शकली आणि संस्कृती गुप्ताने १० धावांचे चांगले योगदान दिले.

### एलिमिनेटर सामना कोणाविरुद्ध?

यासह आता मुंबई इंडियन्सचा संघ १३ मार्चला गुजरात जायंट्स संघाविरूद्ध एलिमिनेटर सामना खेळणार आहे. तर दिल्ली कॅपिटल्सचा संघ थेट अंतिम फेरीत पोहोचल्याने आता १५ मार्च शनिवारी एलिमिनेटरच्या विजेत्या संघाशी फायनल खेळताना दिसेल. अखेरच्या षटकात मुंबईला विजयासाठी २८ धावांची गरज होती. सजना सजीवनने २ षटकार लगावत संघाच्या विजयाच्या आशा उंचावल्या. पण पाचव्या चेंडूवर झेलबाद होत आरसीबीने सामन्यात पुनरागमन करत एलिस पेरीने संघाला विजय मिळवून दिला.मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबई इंडियन्स संघाला खराब फिल्डिंगचा फटका बसला. संघाने अनेक झेल सोडले तर सीमारेषेजवळ चौकार अडवण्यातही खेळाडू अपयशी ठरले. यासह आरसीबीकडून मेघना आणि स्मृती मानधनाने संघाला वादळी सुरूवात करून दिली.

# राहुलने नाकारली कर्णधारपदाची ऑफर

## राहुलने नवा संघ दिल्ली संघाचे कर्णधारपद नाकारले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी विजयानंतर शानदार फॉर्मसह परतल्यानंतर केएल राहुलने कर्णधारपदाबाबत मोठा निर्णय घेतला आहे. राहुलचा हा निर्णय आयपीएलच्या कर्णधारपदाशी संबंधित आहे. राहुल आयपीएल २०२५ साठी आता दिल्ली कॅपिटल्सचा संघाचा भाग असणार आहे. त्यामुळे केएल राहुल दिल्ली संघाचा कर्णधार होईल अशी सर्वांची समज होती. पण आता समोर आलेल्या मीडिया रिपोर्ट्सनुसार, राहुलने आयपीएल २०२५ मध्ये दिल्ली कॅपिटल्सचे कर्णधारपदाची ऑफर नाकारली आहे.**



मीडिया रिपोर्ट्सनुसार, केएल राहुलने कर्णधारपदाची ऑफर नाकारली आणि सांगितले की एक खेळाडू म्हणून संघासाठी जास्तीत जास्त योगदान देऊ इच्छितो. केएल राहुलने कर्णधारपद स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर आता अक्षर पटेल दिल्ली फ्रँचायझीची जबाबदारी स्वीकारू शकतो, अशी चर्चा सुरू आहे. कारण, कर्णधारपदासाठीचा खरा संघर्ष या दोन खेळाडूंमध्ये होता.आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावात दिल्ली कॅपिटल्सने १४ कोटी रुपयांची बोली लावून केएल राहुलला संघात सामील केले. राहुलला यापूर्वी आयपीएलमध्ये कर्णधारपदाचा अनुभव आहे.


२०२०-२१ मध्ये, तो पंजाब किंग्जचा कर्णधार होता आणि २०२२ ते २०२४ पर्यंत, तो लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार होता. त्यामुळे जेव्हा तो दिल्ली संघात दाखल झाला तेव्हा कर्णधारपदाच्या शर्यतीत त्याचे नाव आघाडीवर होते.आता मीडिया रिपोर्ट्समध्ये असा दावा केला जात आहे की राहुलची फक्त एक खेळाडू म्हणून खेळण्याची आहे. राहुल हा आयपीएलमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूंपैकी एक आहे. २०१८ ते २०२४ या कालावधीत खेळलेल्या IPL च्या ७ पैकी ६ हंगामात त्याने ५०० किंवा त्याहून अधिक धावा केल्या आहेत.केएल राहुलप्रमाणे अक्षर पटेलला संघाचे नेतृत्त्व करण्याचा फारसा अनुभव नाही.

अक्षर पटेलने आपल्या अष्टपैलू कामगिरीने नेहमीच आपली छाप पाडली आहे. पण आता दिल्ली कॅपिटल्स त्याच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवणार का यावर सर्वांच्या नजरा असणार आहेत.

### अक्षर पटेलला संघाचे नेतृत्त्व

मीडिया रिपोर्ट्सनुसार, केएल राहुलने कर्णधारपदाची ऑफर नाकारली आणि सांगितले की एक खेळाडू म्हणून संघासाठी जास्तीत जास्त योगदान देऊ इच्छितो. केएल राहुलने कर्णधारपद स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर आता अक्षर पटेल दिल्ली फ्रँचायझीची जबाबदारी स्वीकारू शकतो, अशी चर्चा सुरू आहे. कारण, कर्णधारपदासाठीचा खरा संघर्ष या दोन खेळाडूंमध्ये होता.आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावात दिल्ली कॅपिटल्सने १४ कोटी रुपयांची बोली लावून केएल राहुलला संघात सामील केले. राहुलला यापूर्वी आयपीएलमध्ये कर्णधारपदाचा अनुभव आहे. २०२०-२१ मध्ये, तो पंजाब किंग्जचा कर्णधार होता आणि २०२२ ते २०२४ पर्यंत, तो लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार होता. त्यामुळे जेव्हा तो दिल्ली संघात दाखल झाला तेव्हा कर्णधारपदाच्या शर्यतीत त्याचे नाव आघाडीवर होते. आता मीडिया रिपोर्ट्समध्ये असा दावा केला जात आहे की राहुलची फक्त एक खेळाडू म्हणून खेळण्याची आहे. राहुल हा आयपीएलमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूंपैकी एक आहे. २०१८ ते २०२४ या कालावधीत खेळलेल्या IPL च्या ७ पैकी ६ हंगामात त्याने ५०० किंवा त्याहून अधिक धावा केल्या आहेत.केएल राहुलप्रमाणे अक्षर पटेलला संघाचे नेतृत्त्व करण्याचा फारसा अनुभव नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज ™
ePaper
। बुधवार ।
। दि. 12 मार्च 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



## महापालिका सभेची मान्यता

# मोशीत उभारणार "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण"!

### आमदार महेश लांडगे यांची संकल्पना

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**प्रभाग क्र. २ बोऱ्हाडेवाडी, मोशी प्राधिकरण येथील पेठ क्र. ५ आणि ८ येथील ताब्यात आलेल्या जागेत धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा १०० फुट उंच पुतळा उभारण्यासाठी प्रशासक शेखर सिंह यांनी महापालिका सभेत मान्यता दिली.**

पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असणारे विविध विषय प्रशासक शेखर सिंह यांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. यावेळी विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. या स्थायी समिती सभेत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह संबंधित विभागांचे विभाग प्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

मोशी बोऱ्हाडेवाडी येथील जागेमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येत आहे. भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांनी पुतळा उभारणीसाठी पुढाकार घेतला असून त्याबाबत पाठपुरावा देखील केला आहे. या अनुषंगाने पुतळ्याच्या उभारणीसाठी महासभेची मान्यता मंगळवारी देण्यात आली. या पुतळ्याची ओळख "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" अशी निर्माण झाली आहे.



### शेखर सिंह यांची सकारात्मक भूमिका...

प्रभाग क्र. २ बोऱ्हाडेवाडी मोशी प्राधिकरण येथील पेठ क्र. ५ आणि ८ (पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शनी आणि कन्वेन्शन सेंटर PIECC) येथील १०,११७.१४ चौरस मीटर (२.५ एकर) जागेचा आगाऊ ताबा धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण स्मारकासाठी देण्यात आला आहे. तथापि महाराष्ट्र शासन यांच्याकडील शासन निर्णयानुसार राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यासाठी मान्यता देण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आला असून त्यानुषंगाने प्राधिकरण पेठ क्र. ५ आणि ८ येथील महापालिकेच्या ताब्यात देण्यात आलेल्या जागेवर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा १०० फुट उंच पुतळा उभारण्याच्या ठरावास प्रशासक शेखर सिंह यांनी महापालिका सभेत मान्यता दिली.

# विद्यार्थ्यांनी जाणून घेतले नवीन फौजदारी कायदे

## शिक्षण विश्व: न्यू मिलेनियम ज्युनियर कॉलेजमध्ये नवीन फौजदारी कायद्यांवर विशेष प्रशिक्षण

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**नवीन फौजदारी कायद्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढावी त्यांना कायदेविषयक आकलन व्हावे या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष प्रशिक्षण सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या मनातले प्रश्न तज्ज्ञांच्या उत्तरातून जाणून घेतले.**

नवीन फौजदारी कायद्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढावी त्यांना कायदेविषयक आकलन व्हावे या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष प्रशिक्षण सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या मनातले प्रश्न तज्ज्ञांच्या उत्तरातून जाणून घेतले. पिंपळे गुरव येथील न्यू मिलेनियम इंग्लिश मीडियम स्कूल आणि



ज्युनियर कॉलेज येथे नवीन फौजदारी कायद्यांवरील विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून ॲड.मंगेश खराबे यांना आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमात सांगवी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अंकुश बांगर, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र सावंत उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती इनायत मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या सत्रात ॲड. मंगेश खराबे यांनी भारतीय न्यायसंहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता यातील महत्त्वाचे बदल समजावून सांगितले.

Vया कायद्यान्वये 2023 मध्ये बालकांच्या संरक्षणासाठी आणि कल्याणासाठी काही महत्त्वाच्या तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या.


Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
Gayatri Group of Schools, Pune
BLOSSOM YOUR KNOWLEDGE
TO BE PRESIDED OVER BY
INAUGURATION OF
IN THE AUGUST PRESENCE OF
Indo-Japan Milaap 2025
Hon. Mr. Vinayakrao Bhongale
Founder & President SVSPM, Pune
Hon. Mrs. Kavita Kadu Patil
Managing Director, SVSPM, Pune
With your belief and support, we are organizing a grand interactive event. In the event, you will be introduced to the Japanese language and other industry experts. We seek your presence at the event, which will be a pathbreaking initiative.
Hon. Chief Guests
Hon. Mr. Tomio Isogai San
Hon. Mr. Hiroyuki Ishida San
Guests of Honour
Mr. Amol Nitave
Mr. Ramesh Dhawan
Mr. Saurabh Saraf
Mrs. Priyanka Waichal
Date:
12th March 2025
Time:
4:00 PM
Venue:
Sadhuram Garden,
Moshi, Pune.

## आकुर्डीतील डी. वाय. पाटील कॉलेजमधील प्रकार

# बॉम्बच्या धमकीने धावाधाव!

### ई-मेलने विद्यार्थ्यांसह पोलीसांची धांदल; 6 तासाच्या तपासणीनंतर अफवा असल्याचे स्पष्ट

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**ऐन परिक्षा कालावधीत आकुर्डी येथील डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये बॉम्ब ठेवल्याचा ई-मेल प्राप्त झाल्याने कॉलेज परिसरात एकच खळबळ उडाली. मंगळवारी (दि. ११) सकाळी नऊच्या सुमारास कॉलेज प्रशासनाला हा ई-मेल मिळाला आणि परिक्षार्थी विद्यार्थ्यांसह पिंपरी - चिंचवड पोलिसांची चांगलीच धांदल उडाली. तातडीने पोलिस फौजफाटा कॉलेजमध्ये पाठवण्यात आला. बॉम्ब शोधक-नाशक पथक आणि श्वानपथकाच्या मदतीने संपूर्ण कॉलेजची कसून तपासणी करण्यात आली. तपासानंतर हा मेल खोटा असल्याचे निष्पन्न झाले आणि तब्बल सहा तासानंतर कॉलेज व्यवस्थापनासह पोलीसांनीही सुटकेचा नि:श्वास सोडला. रावेत ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन फटांगरे यांनी याबाबत माहिती दिली.**



आकुर्डी येथे डी. वाय. पाटील इंजिनिअरींग कॉलेज आहे. या कॉलेजमध्ये हजारोंच्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सध्या कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या परिक्षा सुरू आहेत. मंगळवारीही दुपारी विद्यार्थ्यांची परिक्षा होती. सकाळी नऊच्या सुमारास 'आऊटलूक डॉट कॉम' या वेबसाईटवरून कॉलेज प्रशासनाला एक ई-मेल आला. दहाच्या सुमारास प्रशासनाच्या हा ई-मेल निदर्शनास आला. त्यामध्ये कॉलेज परिसरात बॉम्ब ठेवल्याचे नमुद केले होते. हा ई-मेल प्राप्त होताच कॉलेज प्रशासनाने पोलीसात धाव घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बॉम्ब शोधक-नाशक पथक आणि श्वानपथकाला पाचारण करण्यात आले. पोलिसांचा ताफा कॉलेजमध्ये रवाना करण्यात आला. अचानक पोलीसांचा मोठा फौजफाटा पाहून विद्यार्थी आणि प्राध्यापकांमध्ये घबराट पसरली. पोलिसांनी तात्काळ संपूर्ण कॉलेज रिकामे करण्याचे आदेश दिले. सर्व विद्यार्थ्यांना बाहेर काढून तपासणी सुरू केली. परिसरात तपासणी सुरू असताना अफवांना उधाण आले. त्यामुळे पालकांनीही घाईघाईने कॉलेजकडे धाव घेतली. बॉम्ब शोध पथक आणि सायबर सेलच्या मदतीने संपूर्ण कॉलेज परिसराची तपासणी करण्यात आली. तपासादरम्यान कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. शोध घेतल्यानंतर हा ई-मेल खोटा असल्याचे स्पष्ट झाले.

#### सायबर सेलकडून पथक कार्यान्वित...

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी सायबर सेल आणि गुन्हे शाखेच्या विशेष पथकातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वीही अशा स्वरूपाचे धमकीचे मेल शाळा, रुग्णालये आणि महाविद्यालयांना मिळाले आहेत. त्यावेळीही कोणतीही संशयास्पद वस्तू सापडली नव्हती. ज्या ई-मेल अकाऊंटवरून धमकी पाठवण्यात आली आहे, त्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी सायबर क्राइम सेलकडून तपास सुरू आहे, अशी माहिती फटांगरे यांनी दिली.

#### विद्यार्थ्यांचा जीव भांड्यात

कॉलेजमधील काही विद्यार्थ्यांची मंगळवारी परिक्षा होती. दुपारी अडीच वाजता ही परिक्षा होणार होती. मात्र, बॉम्ब ठेवल्याचा ई-मेल आल्यानंतर पोलीस प्रशासनाने सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून संपूर्ण कॉलेज रिकामे केले. त्यामुळे परिक्षा होणार की नाही असा संभ्रम विद्यार्थी आणि पालकांना पडला. मात्र, पोलीसांनी तपासणी करताना ज्या वर्ग खोल्यामध्ये परिक्षा केंद्र आहे, त्या परिक्षा केंद्रामध्ये प्राधान्याने तपासणी केली. तपासात कोणतीही संशयास्पद वस्तू न आढळल्याने या विद्यार्थ्यांची परिक्षा वेळेत पार पडली, असे वरिष्ठ निरीक्षक नितीन फटांगरे यांनी सांगितले.

---

## पिंपरी-चिंचवडमधील माटे शाळेत माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

### शिक्षण विश्व : 1970 ते 1990 या 20 वर्षांच्या आठवणींना मिळणार उजाळा

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**" मागे वळून पाहताना गट आठवणींना उजाळा देऊ या खड्डू ,फळा आणि बाकावर बसणे अनुभवू या" या उद्देशाने माटे शाळेतील माजी विद्यार्थ्यांसाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.त्यामुळे 1970 ते 1990 या 20 वर्षांच्या आठवणींना उजाळा मिळणार आहे.**



श्रीधरनगर, चिंचवड येथील माटे शाळेची स्थापना 1970 मध्ये झाली असून, त्यानंतर 1990 पर्यंत 20 वर्षांमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा होणार आहे. शनिवार, दि. 22 मार्च 2025 रोजी दुपारी 4.30 ते 6.30 या वेळेत हा स्नेहमेळावा रंगणार आहे. कवडसे आठवणीचे, पुनश्च अंगणी आले, सुखद आठवणीची नक्षी, मनी चीतारुणी गेले अशाच सुखद आठवणींचा, झोका मनसोक्त झुलायचा गाणे गप्पा गोष्टींनी, खडू फळ्यात रमायला खुणावितसे शालामाता, आमंत्रण आपणा सकला ! अशाच आपल्या शालेय जीवनातील आठवणींना देऊ या उजाळा .... मित्र-मैत्रिणी, गुरुजनांच्या सहवासात रमायला .... काळाशी सुसंगत आधुनिक डिजिटल सेवा सुविधांनी-प्रगतीसाठी सज्ज झालेली शालामाता ...ग्लोबल शाळा अनुभवायला नक्की या, असे आवाहन शाळा व्यवस्थापक इंद्रायणी पिसोळकर यांनी केले आहे.


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org